Vol III Issue VII Jan 2014

Impact Factor : 1. 9508(UIF)

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR :** 1. 9508(UIF)

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest,Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.net**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 1.9508(UIF)
Volume-3 | Issue-7 | Jan-2014
Available online at www.aygrt.isrj.net

GRT

# मागासवर्गीय महिलांचा स्थानिक स्वराज्य संस्थेमधील सहभाग (संदर्भ : वाशिम जिल्हा)

**महेश आनंदराव मगर , शिवाजी किशनराव बल्लोरे**

संशोधक, सामाजिकशास्त्रे संकुल, स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड.

***सारांश :-*** प्राचिन काळापासून भारतीय समाजव्यवस्था ही वर्णावर आधारीत होती. कालांतरानी वर्णव्यवस्थेच जाती व्यवस्थेत रूपांतर झाले. सध्या भारतीय समाज व्यवस्थेत शेकडो जाती जमाती व उपजाती, उपजमाती आहेत. प्रत्येक जाती व जमातीचे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिय, राजकिय, धार्मिक, शैक्षणिकदृष्टया वैशिष्टये वरकरणी सारखे दिसत असले तरी अंतर्गत मात्र मोठया प्रमाणात फरक असलेला दिसून येतो. त्यावरच आधारित जातीचे मागासर्वीय, इतर मागासवर्गीय असे विभाजन केले.

### *प्रस्तावना :*

समाजातील मागास जातीच्या कल्याणासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात आरक्षणाची तरतूद केली. त्यामध्ये एस्सी, एसटी, एनटी, व्हिजेएनटी, एसबीसी, ओबीसी आणि अल्पसंख्याक अशा विविध गटात विभागले गेलेले आहे. वरिष्ठ समाजाच्या वर्णव्यवस्थेला बळी पडणारा समुदाय म्हणजे मागासवर्गीय होय. यामध्ये अनुसूचित जमाती, बौध्द, कष्टकरी जनता, कामगार, भूमिहीन जमाती, साळी, माळी, धनगर, ढोर, कोळी या सारख्या आदी अनेक जाती, जमातीचा समावेश होतो.

दलित या शब्दाप्रमाणे मागासवर्गीय किंवा अन्य मागासवर्गीय म्हणजे कोण या संदर्भातील विविध मत व मंतातरे आहेत. प्रामुख्याने ''ब्राम्हणेत्तर जातीमध्ये येणारे सर्व मागासवर्गीय असे मानले जाते. तर काही विचारवंतांच्या मते मागास म्हणजे असा लोकवर्ग जो अन्याकारी वर्चस्वाखाली दबलेला होय. मागासवर्गीय शब्द जरी जातीशी पूर्णपणे जोडलेला नसला तरी मागास म्हटले की, जात डोळयासमोर येते आणि या समाजाची किंवा या वर्गाची जाती व्यवस्थेत वरिष्ठ जाती व्यवस्थेकडून पिळवणूक ही झालेली स्पष्ट दिसून येते. 1918 ते 1992 पर्यंतच्या मंडळ आयोगापर्यंतचा अभ्यास केला असता कोणत्या एका धर्माचा मागासवर्गात उल्लेख नसला तरी मागासवर्गीयांचा निकश हा मात्र प्रबळजातीच्या पिळवणुकीतून त्रस्त झालेला समाज मागास संबोधला आहे.

अनेक वर्षापासून भारतीय महिला दुय्यमत्त्वाचे जीवन जगत आलेल्या आहेत. मागासवर्गीय महिलांचा सर्वांगीन विकास घडवून आणण्यासाठी अनेक वर्षापासून अनेक समाजसुधारकांनी वेळोवेळी प्रयत्न केले. स्वातंत्र्यानंतर लिखित राज्यघटनेच्या माध्यमातून स्त्री पुरूष असा कोणताही भेदभाव व ठेवता कायद्याचे अधिराज्य या न्यायाने आधूनिक भारताची व नवसमाजाची निर्मिती करण्याचे लेखी अभिवचन राज्यघटनेच्या माध्यमातून प्रत्यक्षात आणण्यासाठी अनेक कायदे. कार्यक्रम व योजना आखल्या जात आहेत. त्यापैकीच एक स्थानिक स्वराज्य संस्थातील मागासवर्गीय महिलांना आरक्षण हा उपक्रम होय. या उपक्रमाचे उद्दिष्टये म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थेतील प्रतिनिधीत्व देणे, सामाजिक न्याय प्रस्तापित करणे, ग्रामिण विकासाला चालना देणे व मागासवर्गीय महिलामध्ये जाणिव जागृती निर्माण करणे इत्यादी उद्दिष्टांची पुर्तता करण्यासाठी मागासवर्गीय महिला आरक्षणाची संकल्पना पुढे आली.

विषमतावादी समाजातील शोषितांच्या पुर्नवसनासाठी तसेच समाजाच्या न्यायोचित पुर्नरचनेसाठी दिन दुबळयांना अनूकुल असे भेदभाव करण्यासाठीची भूमिका एक धोरण म्हणून राबविण्यासाठी खुल्या स्पर्धेला मर्यादा घालून संरक्षक तरतूद करणे म्हणजे आरक्षण होय. भारतीय संदर्भात निरनिराळया क्षेत्रातील संधी नाकारलेल्या वंचित समाजघटकांना इतर पुढारलेल्या समाज घटकांच्या पातळीवर आणण्यासाठी जो सकारात्मक भेदभाव करण्याच्या धोरणाला आरक्षण अशा व्याख्या अभ्यासकांनी केलेल्या आहेत.

मागासवर्गीयाच्या आरक्षणांचे धोरण समाजातील त्यांची स्थिती पाहता व लोकशाहीतील मागासवर्गीय महिलाचे प्रमाण पाहता अतिअल्प असल्याकारणामुळे 1993 ला भारतीय राज्यघटनेतील 73 वी घटनादूरूस्ती करून स्थानिक स्वराज्य संस्थात मध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीय महिलांना आरक्षणाच्या माध्यमातून प्रतिनिधीत्व देण्यासाठी हि आरक्षणाची पध्दत लागू करण्यात आली. या घटनात्मक कायदयाने इतर महिला वर्गासमवेत मागसवर्गीय महिलांचा देखिल स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये राजकीय दृष्टया सहभाग वाढला आहे.

महाराष्ट्र शासनाने वेगवेगळया समित्या नेमून त्यांच्या अहवालातील शिफारशीनूसार 1992 साली झालेल्या 73 व्या घटना दुरूस्तीनूसार महिलांसाठी 33 टक्के जागा राखीव ठेवण्याची तरतूद केली. त्यानूसार महाराष्ट्र शासनाने जिल्हा परिषद पंचायत समिती अधिनियम, 1961 व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 मध्ये सुधारणा करून 24 एप्रील 1994 पासून महिला आरक्षणाच्या तरतूदीची

अंमलबजावणी सुरू झाली. मागासवर्गीय महिलाच्या आरक्षणाची सुरूवात देखिल याच काळापासून करण्यात आली. मागासवर्गीय महिला आरक्षणाच्या तरतूदीमुळे गेल्या दशकात या महिलाचा राजकीय सहभाग वाढला आहे. ग्रामीण महिला नेतृत्वही निर्माण झाले हे अनेक संशोधनातून सिध्द झालेले आहे, हे सत्य कोणीही नाकारू शकत नाही परंतू मागासवर्गीय महिलांचा संख्यात्मक सहभाग वाढला, नेतृत्व निर्माण झाले पण ते किती प्रमाणात गुणात्मक व कियाशिल आहे याविषयी मात्र कोणीही संशोधन करून निष्कर्ष काढलेले नाहीत म्हणून मागासवर्गीय महिला आरक्षणाच्या फलनिष्पतीसाठी महिलांचा राजकीय सहभाग व निर्णयक्षमता इत्यादीचा आढावा घेण्यात आला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये मागासवर्गीय महिलांचा सहभाग वाढला असला तरी त्यांना त्याच्या अधिकाराचा उपयोग करू दिला जात नाही. याचा अभ्यास करण्यासाठी व समाजाचा एक भाग म्हणून हा विषय अभ्यासन्याची गरज आहे. मागासवर्गीय समाजातील स्त्रियांचा दर्जा व भूमिका यामध्ये परिवर्तन झाले किंवा नाही या पैलुचा अभ्यास करण्यासाठी, तसेच त्यांचे समाजातील स्थान अभ्यासण्यासाठी, मागासवर्गीय समाज इतर समाजाच्या तुलनेत कमी असल्याने शासकीय स्तरावर म्हणावे तसे त्यांचे प्रश्न सुटलेले दिसून येत नाहीत. त्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. आज स्थितीला मागासवर्गीय महिलांना अनेक अडचणींना व समस्यांना तोंउ दयावे लागते आहे. त्या दृष्टीने ही या मागासवर्गीय महिलांचा सखोल अभ्यास करण्यासाठी या अभ्यासाचे महत्त्वाचे आहे.

## प्रस्तुत शोधनिबंधाचा उद्देश

1. मागासवर्गीय महिलांच्या वैयक्तिक, कौटुंबिक, राजकीय स्थितीचा अभ्यास करणे.
2. मागासवर्गीय समाजातील स्त्रीयाचे स्थान कसे आहे ते पाहणे.
3. मागासवर्गीय समाजातील महिलांच्या राजकीय जीवनाचा अभ्यास करणे.
4. स्थानिक स्वराज्य सस्थेमध्ये कार्य करतांना मागासवर्गीय महिलांना काय अडचणी येतात याचे अध्ययन करणे.

## संशोधन पध्दती

मागासवर्गीय महिलांचा स्थानिक स्वराज्य संस्थेमधील सहभाग (संदर्भ : वाशिम जिल्हा) हे विशय अभ्यासण्यासाठी खालील पध्दतीचा अवलंब आला होता.

## संशोधनाची व्याप्ती

संशोधनाची व्याप्ती महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थातील मागासवर्गीय महिलाचा सहभाग या संदर्भात असली तरी सखोल व सविस्तर संशोधन कार्य करण्यासाठी संदर्भीय अध्ययन क्षेत्र म्हणून महाराष्ट्रातील वाशिम जिल्हातील उपलब्ध स्थानिक स्वराज्य संस्थातील महिला प्रतिनिधी व पदाधिकाऱ्यांचा अभ्यास करून त्यांचा सहभाग व त्यामागील फलनिपती निर्धारित केली आहे.

## नमुना निवड

संशोधन करतांना वाशिम जिल्हयातील प्रत्येक तालुक्याना समान न्याय देण्याच्या दृष्टीने 6 तालुक्यातील एकुण 60 मागासवर्गीय महिलांचा अभ्यास केलेला आहे. प्रस्तुत अध्ययनात मागसवर्गीय समाजातील स्थानिक स्वराज्य संस्थेमधील महिलांचा गैरसंभाव्यता नमुना निवडीतील सहेतुक नमुना निवड पध्दतीचा अवलंब करून पंचायतराज व्यवस्थेतील तिन स्तरावरील एकूण 30 तर महानगरपालिका, नगरपालिका व नगरपरिषदेतील 30 मागासवर्गीय महिला प्रतिनिधी व पदाधिकारी याप्रमाणे अशा एकुण 60 मागासवर्गीय महिला प्रतिनिधीची नमुना म्हणून निवड करून तथ्य संकलन करण्यात आले.

## तथ्य संकलन

प्रस्तुत शोध निबंधाचे तथ्यसंकलन हे प्राथमिक तथ्य या पध्दतीमध्ये मुलाखत अनुसूचीचा वापर करण्यात आला आहे. तर दुय्यम तथ्य संकलन पध्दतीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थी निघडीत लिखीत दस्तवेज, वार्षिक अहवाल या दोन तथ्य संकलनाच्या पध्दतीद्वारे तथ्य संग्रहीत करण्यात आलेले आहे.

## निष्कर्ष,

प्रस्तावित अभ्यासकमामध्ये वाशिम जिल्हातील स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये निवडलेल्या मागासवर्गीय महीलांना राजकारणामध्ये येण्याची संधि घटनेच्या 73 व्या व 74 व्या घटणा दुरूस्तीमुळे प्राप्त झाल्याचे दिसून येते. शोधनिबंधाच्या नमुना निवडीत मागासवर्गीय महिलाच्या वैयक्तिक माहितीचा विचार करताना असे निदर्शनास येते की सर्वाधिक महिला हया 30 ते 40 व्या वयोगटातील आहेत. त्यामध्ये सर्वाधिक महिला या अशिक्षीत तर फक्त काही नवसाक्षर असल्याचा आढळून आल्यात हाच मागासवर्गीय महिलांच्या स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिला सहभागाचा मोठा प्रमुख अडथळा वाटतो कारण शैक्षणिक स्तर कमी असल्यामुळे राजकारण व इतर प्रशासकीय बाबी महिलांना समजत नाहीत व त्यामुळे बऱ्याच ठिकाणी त्या फक्त कागदावरील सही मारण्यापुरत्याच मर्यादित राहिलेल्या आहेत.

मागासवर्गीय महिलाच्या वार्षिक उत्पन्नाचा विचार करता आधिकाधिक 69 टक्के महिलांचे वार्षिक उत्पन्न हे 25,000 रूपया पेक्षा

कमी आहे. 67 टक्के महिलांचा व्यवसाय हा शेती सोबत किंवा शेतीवरील मजुरीशी संबंधीत आहे. 64 टक्के महिलांचे घरे हे अर्धे कच्चे व अर्धे पक्के अशा स्वरूपाचे असल्याचे निदर्शनास आले. संपूर्ण स्वच्छता अभियान कार्यक्रमामुळे व प्रतिनिधींना शौचालय बांधने अनिवार्य असल्यामुळे 64 टक्के महिलांच्या घरी शौचालय असल्याचे आढळून आले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थेतील सर्वाधिक 72 टक्के महिलांचे पद हे सदस्य स्वरूपाचे असून फारच कमी प्रमाण हे संरपंच, नगराध्यक्ष व सभापती असल्याचे आढळून आले आहेत्र आधिकाधिक 66 टक्के महिला या कॉंग्रेस व राष्ट्रवादी या राजकीय पक्षाशी संलग्नीत आहेत. 90 : महिलांनी सर्वच प्रकारच्या प्रचार मोहिमेचा वापर केल्याचे आढळून आले आहे. अधिकाधिक 93 : महिलांच्या मते मागासवर्गीयाकरीता असलेल्या आरक्षणामुळेच राजकारणामध्ये प्रवेश झाला असल्याचे आढळून आले आहे. तर आधिकाधिक 89 टक्के महिलांच्या मते राजकारणातील प्रवेश केल्याचा फायदा झाल्याचे आढळून आले.

स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये सर्वच प्रकारच्या प्रक्रियेमध्ये त्यांच्या सोबत कधी महिला म्हणून तर कधी मागासवर्गीय म्हणून भेदभाव होत असल्याचे सर्वाधिक 67 % प्रमाण आहे. त्यांचे कारण स्पष्ट करताना 42 % महिलांनी मागासवर्गीय असल्यामुळे तर 36 % पुरूषप्रधान संस्कृतीमुळे सहकार्य न मिळण्याचे कारणे सांगितली आहेत. सर्वाधिक 50 % महिलां बैठकीस सहभागी होत नाहीत. यावरून इथे हे लक्षात येते की घटनादुरूस्तीचा मुख्य उद्देश इथे दुर रहात आहे. प्रतिनीधी बोलवण्यात येतो का या प्रश्नाचे उत्तर देतांना 52 % महिलांनी नाही. तर 46 % महिलांनी होय असे उत्तर दिले आहे. यावरून असे म्हणता येईल की मागासवर्गीय महिलांना गृहीत धरून स्थानीक स्वराज्य संस्थेमये कार्यभार सुरू असतो. 72 % महिलांना ठराव पास करतांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे म्हणणे आहे. स्थानीक स्वराज्य संस्थामध्ये आधिकाधिक बैठकिस जाताना 79 % मागासवर्गीय महिलांनी त्यांच्या सोबत त्याचे पती असल्याचे सांगतात. 62 % महिलाच्या मते स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये वेळेवर सभा आयोजित होत नसल्याचे म्हटले आहे. तसेच इच्छा असूनही काहीच करता येत नसल्याची खंत मागसवर्गीय महिलांनी व्यक्त केल्याचे प्रमाण सर्वाधिक आहे.

मागासवर्गीयातील सर्वाधिक 72 % महिलांच्या मते महिला ग्रामसभा आयोजित केली जात नसल्याची निदर्शनास येते. स्थानिक स्वराज्य संस्था निर्णय प्रक्रियेत सर्वाधिक 46 % महिला प्रतिनिधी निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी होतात.

स्थानिक स्वराज्य संस्थेतील अधिकारी/कर्मचारी त्यांना सहकार्य करीत नसल्याचे 52 % प्रमाण आहे. सर्वाधिक 71% उत्तरदात्यांचे मते अधिकारी/कर्मचारी यांचे सोबत काम करतांना त्यांना अडचणी येतात कारण कर्मचारी सार्वजनिक हिताऐवती वैयक्तिक हिताकडे जास्त लक्ष देत असल्याचे आढळून आले. 65 % महिलांना स्थानिक संस्थामध्ये काम करताना त्यांना नागरिकांचे सहकार्य मिळत असल्याचे स्पष्ट होते.

स्थानिक स्वराज्य संस्थमधील 61 % मागसवर्गीय महिलांच्या मते त्यांना 15 ऑगस्ट, 26 जानेवारी, आंबेडकर जंयती, सावीत्रीबाई फुले जयंती या प्रकारच्या विविध कार्यक्रमामध्ये बोलाविले जात असल्याचे स्पष्ट होते. 56 % मागासवर्गीय महिलांचे मते त्यांना विविध प्रकारच्या सार्वजनिक तक्रारी सोडविण्याकरीता बोलाविले जात असल्याचे म्हटले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये निवडून आलेल्या मागासवर्गीय महिलांचे मते त्यांना सवर्णासोबत काम करायला आवडते मात्र मागासवर्गीय महिला म्हणून त्यांना निर्णयप्रक्रियेत सहभागी करूण घेत नसल्यांची खंत त्यांनी व्यक्त केली असल्याचे दिसून येते.

स्थानिक स्वराज्य सस्थेमध्ये निवडून आलेल्या आधिकाधिक मागासवर्गीय महिलांचे मते त्यांचे भागातील मुख्य समस्या, विज, आरोग्य, रस्ते, पाणी या मुलभुत प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घेत असल्याचे आढळून आले आहे. 69 % महिलांच्या मते निवडून येण्यापूर्वी त्यांनी कोणतेही समाजकार्य केलेले नाही मात्र स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये निवडून आल्यावर समाजकार्य करण्याची संधी उपलब्ध झाली असल्याचे निदर्शनास आले. 71 % महिलाच्या मते स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये कार्यक्रमांची अंमलबजावणी होण्यामध्ये कर्मचाऱ्यांचा भ्रष्टाचार खुप मोठया प्रमाणात जबाबदार असल्याचे मत महिलांनी व्यक्त केले आहे. 67% महिलांच्या मते त्यांनी यशदा व स्वंय सेवी संस्थेतील आयोजित केलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रशिक्षणामध्ये सहभाग घेतल्याचे म्हणणे आहे. 67 % स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये निवडून आलेल्या 67 % महिलांच्या मते त्यांना पुढील निवडणूक लढविण्याची इच्छा आहे. मात्र स्थानिक स्वराज्य संस्थेतील मागासवर्गीय महिलांच्या स्थिती बदल त्या असमाधानकारक आहेत.

## *सुचना व सांराश*

थोडक्यात 73 व्या व 74 व्या घटणादुरूस्तीमुळे मागासवर्गीय महिलांचा आरक्षणाच्या तरतुदीमुळे गेल्या दशकात महिलांचा राजकीय सहभाग वाढला आहे. ग्रामीण महिला नेतृत्वही निर्माण झाले. वरिल मागसवर्गीय महिलाच्या अभ्यासातुन मात्र घटणादुरूस्तीचा मुळ उद्देश अनेक अडचणीमुळे साध्य होत नसल्याचे स्पष्ट होते. स्थानिक स्वराज्य संस्थेतील मागासवर्गीय महिलांचा सहभाग वाढवून गुणवत्ता सुधारण्यासाठी संशोधक म्हणून खालील सूचना कराव्यास्या वाटतात.

1. स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये निवडणूक लढविणाऱ्या सर्वच राजकीय नेत्यांना व महिलांना शिक्षणाची अट असली पाहिजे.जेणेकरूण शाासणाकडून होत असलेल्या विविध योजना व विकास कार्यक्रम त्यांना समजून अंमलबजावणी करणे सोईचे होईल.
2. लिंग भेदभाव प्रशिक्षण कर्मचाऱ्यांना व नेत्यांना दिले गेले पाहिजे जेणेकरून ते महिलांना दुय्यमत्व देणार नाहीत.
3. स्थानिक स्वराज्य संस्थेअंतर्गत दिल्या जात असलेले प्रशिक्षण अधिक प्रभावी करण्याची गरज वाटते.
4. स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये निवडून आलेल्या महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी त्यांचे सोबत त्यांचे पती, भाऊ व पुरूष मंडळींना प्रवेश मनाई असली पाहिजे.
5. स्थानिक स्वराज्य संस्थातील महिला प्रतिनिधींना विविध विकास कार्यक्रम राबवीण्या संबंधीचे त्यांच्या अधिकार व कर्तव्याबाबतचे प्रशिक्षण

देण्यात यावे.
6. मागासवर्गीय महिलांना वेळोवेळी होणाऱ्या सभा व बैठकांना उपस्थित राहणे बंधणकारक करावे.
7. मागासवर्गीय महिलांना सर्वण लोकांकडून होणाऱ्या निच्च वर्तणुकीला प्रतिबंध घालण्यासाठी तसा कायदा निर्माण करणे गरजेचे वाटते.

संशोधकाला असे आढळून आले की, स्थानिक स्वराज्य संस्थेत मागासवर्गीय महिला आरक्षणाची अंमलबजावणी अद्याप प्राथमिक आवस्थेत आहे. तसेच ग्रामीण व आदिवासी भागातील मागासवर्गीय महिलांसाठी हे क्षेत्र नविन आहे. म्हणून मागासवर्गीय महिला आरक्षणाच्या फलनिष्पती निर्धारक घटकांची सिध्दता हळूहळू सिध्द होतांना दिसून येते.

## *संदर्भ सुची*

– कुलकर्णी अ.ना. (2000) : भारतातील स्थानिक स्वशासन, विद्या प्रकाशन, नागपुर.
– खडसे भा. कि. (2002) : जाती व वर्ग आणि भारतीय आदिवासी, यंशवतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
– वाधवा शालिनी (2010) : भारत स्थानीय प्रशासन, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, दिल्ली
– जैदी इजलाल अनीस (1988) : पॉलिटिक्स पॉवर एण्ड लीडरशिप इन रूरल इण्डिया, कॉमनवेल्थ पब्लिशर्स, नई दिल्ली.
– विद्या के. सी. (1997) : पॉलिटिकल एम्पावरमैंट ऑफ वुमन एट द ग्रासरूट, कनिश्क पब्लिशर्स, दिल्ली.
– सिंह अवतार (1963) : द इम्पेक्ट ऑफ द कम्यूनिटी डैवलमैंट प्रोग्राम ऑन रूरल लीडरशीप,
– पार्क एण्ड टिंकर संपा लीडरशिप एण्ड पॉलिटिकल इन्स्टीट्यूशन ऑक्सफोर्ड युनिवर्सिटी प्रेस, मद्रास
– सिसोदिया यतीन्द्रसिंह (2000) : पंचायतराज एवं अनुसूचित जाति महिला नेतृत्व, रावत पब्लिकेंशन्स, जयपुर.
– दास प्रवाकर (1994) : इमर्जिंगपैटर्न ऑफ लीडरशिप इन ट्रायबल्स इंडिया, मानक पब्लिकेशन्स, नई दिल्ली
– भट्ट आशीश (2002) : लोकतान्त्रिक विकेंन्द्रीकरण एवं जनजातीय नेतृत्व, रावत पब्लिकेशन्स, जयपूर
– वाजपेयी अशोक (1997) : पंचायतराज एण्ड रूरल डैवलपमैंट, साहित्य प्रकाशन, दिल्ली.
– बोधनकर सुधीर (1999) : सामाजिक संशोधन पध्दती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
– पोले कांतराव प्रल्हादराव (2005) : महाराष्ट्रातील पंचायतरामधील महिला आरक्षणाची फलनिष्पत्तीः लातूर जिल्हाचा अभ्यास, अप्रकाशीत शोधप्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.net